REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 9 | JUNE - 2023

# नवोपक्रमाचे शिर्षक :- मंगरूळ टॅलेंट सर्च (MTS)

**श्री. सुखदेव विष्णू भालेकर**
एम.ए. (इंग्रजी, इतिहास, शिक्षणशास्त्र), डी.एड, बी.एड, डी.एस.एम., एम.एड
प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चव्हाणवाडी ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद.

**नवोपक्रमाचे गरज व महत्व :-** ---



ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या व खाजगी शाळेतील विद्यार्थ्यामध्ये स्पर्धापरीक्षेची आवड निर्माण व्हावी. तसेच ग्रामीण भागातील मुलांना स्पर्धा परीक्षेची लहानपणापासून पाया भक्कम व्हावा या उद्देशाने **"मंगरूळ टॅलेंट सर्च (MTS)"** या नवोपक्रमाची खऱ्या अर्थाने गजर भासली. या नवोपक्रमाच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या सर्वच वाचकांना उपयोगात येईल. विशेष करून इयत्ता पहिली ते आठवी मुलांना जास्त उपयोगाचे पडेल.

मंगरूळ टॅलेंट सर्च (MTS) या उपक्रमाचा प्रयोग मंगरूळ बीट मध्ये नांदूरी व येवती केंद्रामध्ये सन 2019 2020 मध्ये वर्षभर करण्यात आला.तसेच तो उपक्रम सन 2019 2020 पासून ते सन 2022 2023 पर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चव्हाणवाडी व केंद्रातील बऱ्याच शाळांमध्ये घेतला जातो. वर्षभर नियमित 5 ते 10 प्रश्न विद्यार्थ्यांना ऑनलाईन (व्हॉट्स ॲप) माध्यमातून पाठविण्यात आले. त्याप्रश्नाचे पाठांतर व लेखन परिपाठाच्यावेळी आमची शाळा, मंगरूळ बीट मधील येवती व नांदूरी केंद्रात नियमीत करण्यात आले. त्याचा परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षेतील गुणवत्ता व शाळेतील गुणवत्ता वाढीस मदत झाली. व स्पर्धा परीक्षेची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माणी झाली.

हा नवोपक्रम राबविण्यासाठी पंचायत समिती, तुळजापूरचे गट शिक्षण अधिकारी तथा मंगरूळ बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी श्री. माने एम. ई. साहेब यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. त्याचप्रमाणे नांदूरी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. संजय वाले साहेब, येवती केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. गायकवाड साहेब, केंद्रीय मुख्याध्यापक श्री. दुधांबे साहेब व श्री. माळी साहेब, चव्हाणवाडी शाळेचे मुख्याध्यापक श्री. जेटीथोर एस. डी., राज्यपुरस्कार प्राप्त श्रीमती. रंजना स्वामी मॅडम, आदर्श शिक्षक श्री. मोरे बापूराव,श्री. साखरे साहेब, श्री. राजाभाऊ क्षिरसागर, माझ्या शाळेतील सर्व सहकारी शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती चव्हाणवाडी व समस्त ग्रामस्थ यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

मी हा नवोपक्रम ज्या बीटमध्ये व चव्हाणवाडी शाळेमध्ये घेतला तिथे स्पर्धा परिक्षेचे वातावरण चांगले होते. परंतू त्यामध्ये सामान्यज्ञान वाढविण्याची कमतरता होती, ती या उपक्रमाच्या माध्यमातून पूर्ण करावी म्हणून हा नवोपक्रम घ्यावासा वाटला.

Knowledge is a power या उक्तीनुसार आजवर अनेकांनी ज्ञानाच्या बळावर आपले स्वत:चे आयुष्य घडविले. एवढेच नव्हे तर, त्या ज्ञानाचा वारसा पुढे नेत या समाजाला एका विशिष्ठ उंचपर्यंत पोहचवून स्वत:चे कर्तृत्व सिद्ध केले आहे. आज समाजामध्ये अनेक यशस्वी लोक आहेत, ज्यांची कोणतेही शैक्षणिक पार्श्वभूमी नसताना त्यांनी मिळविलेल्या यशाचे

महत्व या ज्ञानात आहे. याच ज्ञानाच्या जिवावर ग्रामीण भागातील कित्येक गरीब विद्यार्थी जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार यासारख्या मोठमोठ्या पदावर विराजमान झालेले दिसून येतात. सध्याच्या या स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर सामान्य ज्ञानाची परिपूर्ण माहिती असलीच पाहिजे. यासाठीच या नवोपक्रमाची गरज व महत्व समजून हा उपक्रम राबविण्यात आला.

## नवोपक्रमाची उद्दिष्टे :-

1) या नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामान्य ज्ञान वाढविण्यासाठी अभिरूची निर्माण करणे.
2) या नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धापरीक्षेमध्ये चालू घडामोडींचे ज्ञान घेण्याची आवड निर्माण करणे.
3) अवांतर वाचनाची आवड निर्माण करणे.
4) स्पर्धा परीक्षेबाबतीत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे.
5) विद्यार्थी व शिक्षक स्पर्धा परीक्षेत जास्तित जास्त यशस्वी करण्यासाठी मदत करणे.

## नवोपक्रमाचे नियोजन :-

---- मंगरूळ बीट मधील व चव्हाणवाडी शाळेमधील प्रत्येक इयत्तेतील प्रज्ञावान विद्यार्थी शोधून अशा विद्यार्थ्यांचा गुणगौरव व्हावा व त्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी सन 2019 2020 ते सन 2022 2023 मध्ये "मंगरूळ टॅलेंट सर्च (MTS)" परीक्षा घेण्याचे निश्चित केले होते. सदर नवोपक्रम हा सन 2022 2023 मध्ये जून 2022 एप्रिल 2023 पर्यंत घेण्यात येत आहे. प्रत्येक महिन्याच्या शेवटी सराव चाचणी घेवून बक्षीस देण्यात येते. सदर फोटो खालीलप्रमाणे आहेत.



सराव चाचणी



बक्षीस वितरण

### "मंगरूळ टॅलेंट सर्च (MTS)" महत्वाच्या तारखा व नियोजन :-

| | | |
|---|---|---|
| 1 | नियमित प्रश्न पाठविणे | 15 जून 2022 15 एप्रिल 2023 |
| 2 | सराव चाचणी | प्रत्येक महिन्याच्या 30 तारखेला |
| 3 | मंगरूळ टॅलेंट सर्च (MTS) परीक्षा | 16 एप्रिल 2023 |
| 4 | निकाल जाहिर करणे | 17 एप्रिल 2023 |
| 5 | पुरस्कार वितरण | 01 मे 2023 |

या परीक्षेतून प्रत्येक इयत्तेतील गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास बीट स्तरीय ज्ञानरत्न पुरस्कार, द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यास बीट स्तरीय ज्ञानभूषण पुरस्कार व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यास बीट स्तरीय ज्ञानश्री पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे. त्याबाबत खालीलप्रमाणे नियोजन असणार आहे.

| गट | इयत्ता | प्रश्नपत्रिकेतील प्रश्नसंख्या | एकूण गुण | परिक्षेचा कालावधी | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| पहिला | पहिली व दुसरी | 50 | 50 | 01 तास | सकाळी 10 ते 11 |
| दुसरा | तिसरी ते पाचवी | 100 | 100 | 01 तास 30 मिनीट | सकाळी 10 ते 11:30 |
| तिसरा | सहावी ते आठवी | 100 | 100 | 01 तास 30 मिनीट | सकाळी 10 ते 11:30 |

- सदर परीक्षेसाठी प्रत्येक शाळेतील, प्रत्येक वर्गातील तीन विद्यार्थी उपस्थिती राहतील. उदाहरणार्थ पहिली ते आठवी वर्ग असेलेली शाळा असल्यास इयत्ता पहिलीतील तीन विद्यार्थी , इयत्ता दुसरीतील तीन विद्यार्थी, इयत्ता तिसरीतील तीन विद्यार्थी या प्रमाणे आठ इयत्तांचे एकूण 24 विद्यार्थी एका शाळेतील परीक्षेसाठी उपस्थित असतील.

## व्यवस्थापन व सनियंत्रण :

| अ.क्र. | नाव | कार्यरत असलेली शाळा | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | श्री. सुखदेव भालेकर | जिल्हा परिषद प्रा.शा., चव्हाणवाडी | |
| 2 | श्री. जेटीथोर एस. डी. | जिल्हा परिषद प्रा.शा., चव्हाणवाडी | |
| 3 | श्री. जेटीथोर अशोक | जिल्हा परिषद प्रा.शा., चव्हाणवाडी | |
| 4 | श्री. भोईटे बलभीम | जिल्हा परिषद प्रा.शा., चव्हाणवाडी | |
| 5 | श्रीमती. देशमूख मॅडम | जिल्हा परिषद प्रा.शा., चव्हाणवाडी | |
| 6 | श्रीमती. पाटील गिताश्री | जिल्हा परिषद प्रा.शा., चव्हाणवाडी | |
| 7 | श्रीमती. लांडगे द्रौपदी | जिल्हा परिषद प्रा.शा., चव्हाणवाडी | |

## नवोपक्रमाची कार्यपद्धती :-

आमच्या शाळेमध्ये **“मंगरूळ टॅलेंट सर्च (MTS)”** हा उपक्रम सन 2019 पासून ते सन 2022 2023 पर्यंत राबविला जात आहे. ज्यावेळेस या उपक्रमाचे नाव विद्यार्थ्यांना कळले त्यावेळेस मुलांमध्ये हा उपक्रम काय आहे? हे जाणून घेण्याचे जिज्ञासा निर्माण झाली. तसेच या उपक्रमाचा विद्यार्थ्यांच्या जिवनात किती महत्वाचा आहे व शिक्षकाच्या जिवनात भविष्यातील स्पर्धा परीक्षा देण्यासाठी किती महत्वाचा आहे, हे समजावून सांगितल्यावर विद्यार्थी व शिक्षकामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

स्पर्धा परीक्षेकडे ग्रामीण भागातील विद्यार्थी नकारार्थी पाहायचे. परंतू या उपक्रमाच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षेकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला आहे. विद्यार्थी व शिक्षक यांच्या ज्ञानामध्ये भर पडत आहे. अवांतर वाचन वाढत आहे. तसेच हा उपक्रम राबवत असताना शाळेतील सर्व शिक्षक व वरिष्ठ अधिकारी यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच चव्हाणवाडी गावातील ग्रामस्थांनीही सहकार्यभाव दाखविला. त्यामुळे हा उपक्रम घेत असताना प्रथम तीन क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना स्वत:हून शैक्षणिक साहित्य देवून मुलांचा आत्मविश्वास वाढविला व कौतुक केले.

सदर नवोपक्रम नियमित परिपाठाच्यावेळी घेण्यात येतो. परिपाठामध्येच शाळेतील सर्वच मुलांना सदर प्रश्न लिहून देण्यात येतात. मुले ते प्रश्न आवडीने वहीमध्ये लिहून घेऊन पाठांतर करतात. व सराव चाचणीमध्ये नंबर मिळविण्यासाठी व बक्षीस मिळविण्यासाठी चढाओढ लागलेली पाहावयास मिळते. एकंदरीत शाळेमध्ये स्पर्धा परीक्षेचे या नवोपक्रमामुळे चांगले वातावरण निर्माण झाले आहे. याचीच फलनिष्पत्ती म्हणजे “Osmanabad Talent Search” ही परीक्षा जिल्हा परिषद, उस्मानाबाद च्या वतीने घेण्यात आली होती. त्यापरीक्षेमध्ये जिल्ह्यातील प्रथम क्रमांक मिळविलेले विद्यार्थी आमच्या शाळेत आहेत. त्यामुळे सदर उपक्रम हा नियोजनबद्ध शाळेमध्ये सूरू आहे.

## नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती :

1) या नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामान्य ज्ञान वाढविण्यासाठी अभिरूची निर्माण झाली.
2) या नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धापरीक्षेमध्ये चालू घडामोडींचे ज्ञान घेण्याची आवड निर्माण झाली. तसेच वर्तमानपत्रे वाचू व बातम्या पाहू लागले.
3) अवांतर वाचनाची आवड निर्माण झाली व याचीच फलनिष्पत्ती म्हणजे ग्रंथालयातील पुस्तके जास्तीत जास्त वाचू लागली.
4) स्पर्धा परीक्षेबाबतीत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली आणि विविध स्पर्धा परीक्षेत यश मिळवू लागले.
5) विद्यार्थी व शिक्षक स्पर्धा परीक्षेत जास्तित जास्त यशस्वी करण्यासाठी मदत झाली. याचीच फलनिष्पत्ती म्हणजे "Osmanabad Talent Search" ही परीक्षा जिल्हा परिषद, उस्मानाबाद च्या वतीने घेण्यात आली होती. त्यापरीक्षेमध्ये जिल्ह्यातील प्रथम क्रमांक मिळविलेले विद्यार्थी आमच्या शाळेत आहेत.

## समारोप :

माझ्या उपक्रमामुळे माझे विद्यार्थी व शिक्षक तसेच माझ्या स्वत:मध्येही सामान्यज्ञान वाढीसाठी बराच बदल झाला. मुले यापूर्वी शाळेतील अभ्यासाव्यतिरीक्त इतर अवांतर पुस्तकांचे अल्पवाचन होते. तसेच सामान्य ज्ञानाचे अल्पज्ञान होते. ते या नवोपक्रमाच्या माध्यमातून वाढलेले पाहवयास मिळते. तसेच विविध स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून यशस्वी होताना दिसून येत आहेत. तसेच या नवोपक्रमामुळे शाळेत झालेला बदल पालकांच्या लक्षात आला असल्यामुळे शाळेबद्दल गोडी व प्रेम निर्माण झाले आहे.

प्रत्यक्ष कार्यवाहीत नाविण्याचा व नविन ज्ञान जाणून घेण्याचा मागोवा घेणाऱ्या माझ्या शाळेत व बीट मध्ये मला मिळालेली संधी मोलाची मानून मी हा उपक्रम राबविला. माझ्या प्रत्येक उपक्रमात उत्सहाने सहभागी होणारे माझे विद्यार्थी, त्यांचे पालक, माझ्या शाळेतील सहशिक्षक, मुख्याध्यापक व वरिष्ठ अधिकारी हे माझ्या उपक्रमाच्या यशातील खरे वाटेकरी आहेत. त्यांचे मला सहकार्य लाभले म्हणून **"मंगरूळ टॅलेंट सर्च (MTS)"** हा उपक्रम यशस्वी झाला.

**"केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे"** या उक्तीचा मला या निमित्ताने प्रत्यय आला.

## संदर्भसूची व परिशिष्टे :-

1) इयता पहिली ते आठवीची सर्व शालेय पुस्तके,पुणे, महाराष्ट्र.
2) विद्याभारती जनरल नॉलेज (सामान्यज्ञान), विद्याभारती प्रकाशान, लातूर.

- --



**श्री. सुखदेव विष्णू भालेकर**
एम.ए. (इंग्रजी, इतिहास, शिक्षणशास्त्र), डी.एड, बी.एड, डी.एस.एम., एम.एड
प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चव्हाणवाडी ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद.